# पश्चिम विदर्भातील आदिवासींच्या समस्या व त्यावरील उपाय योजनांचे चिकित्सक अध्ययन.

प्रा. अनिल शिवाजी भुरके[1] , प्रा. विणा विनायकराव तोरकडे[2]
[1]इतिहास विभागश्री. शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय पुसद.
[2]रामकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय दारापुर, अमरावती.



## प्रस्तावना :

विदर्भ हा महाराष्ट्र राज्याच्या एक भौगोलीक प्रदेश महाराष्ट्राच्या पुर्व दिशेला असुन भारताच्या मध्यवर्ती ठिकानी वसलेला आहे. या भुप्रदेशाचा विस्तार उत्तर अक्षांश 90°ते 22°47 आणि पुर्व रेखांश 76°ते 81°या दरम्याने झालेला आहे. विदर्भाच्या उत्तरेस आणि पुर्वेश मध्य प्रदेश छत्तीसगढ, पश्चिमेस जळगांवचा खानदेशचा भाग, मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, दक्षिणेश परभणी, हिंगोली, नांदेड हे मराठवाड्यातील जिल्हे आहेत. व आंध्रप्रदेशचा भाग असून विदर्भातील क्षेत्रफळ 98000 वर्ग कि.मी. आहे. विदर्भात नागपुर, वर्धा, भंडारा, गोदिंया, गडचिरोंली, चंद्रपुर अमरावती, आकोला, बुलठाना, वाशिम यवतमाळ या जिल्हाचा समावेश असुन विदर्भाची विभागणी पुर्व विदर्भ व पश्चिम विदर्भ झाली आहे. तर पश्चिम विदर्भात अमरावती, आकोला, बुलठाना, यवतमाळ व वाशिम या जिल्हाचा समावेश होतो. पश्चिम विदर्भातील आदिवासी जमातीचे अध्ययन करताना अमरावती जिल्हात गोंड, कोरकु, भिल्ल, पारधी, हलबा, निहाल ह्या जमाती प्रामख्याने दिसुन येतात. तर आकोला जिल्हामध्ये आंध, पारधी, गोंड, भिल्ल, इत्यादी जमाती दिसुन येतात. बुलढाना जिल्हात आंध, महादेव कोळी, पारधी, इत्यादी जमाती आहेत. यवतमाळ जिल्हात गोंड, कोलाम, आंध, पारधी, हलबा हलबी, खारिया, परधान इत्यादी आदिवासी जमाती आपणास दिसुन येतात.



आज ही या जमातीमध्ये पाहीजे त्या प्रमाणात बदल झालेला आपणास दिसुन येत नाही. बहुतांश आदिवासी आजही जंगल, दऱ्याखोऱ्यात नदिच्या पात्राजवळ आपली वस्ती करून राहताना दिसुन येते. या आदिवासी जमातीत विकास झाल्याचे दिसुन येत नाही. महाराष्ट्र शासनाच्या योजना आजही त्यांच्या पर्यंत पोहचतंच नाही. त्या मुळे या आदिवासी समाजाला या योजनेपासुन लाभ मिळत नाही. आजही ग्रामीण भागातील आदिवासी समाज हा शिक्षणापुन वंचित आहे. यांचा फायदा प्रगत समाजातील लोक घेत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या पर्यंत शैक्षणिक विकास योजना पोहचत नाही आणि पोहचल्या तरी त्याची योग्य अमलबजावनी होत नाही. आदिवासी समाजात अनेक वाईट रूढी, प्रथा, परंपंरा ह्या प्रगत समाजाच्या संर्पकात आल्याने निर्माण झाल्या आहे. त्यामुळेचं पश्चिम विदर्भात आदिवासी

मध्ये अनेक समस्या दिसुन येतात.

### पश्चिम विदर्भातील आदिवासींच्या समस्या
### पष्चिम विदर्भातील आदिवासींच्या समस्याचे मुख्य कारणे म्हणजे.....

1)भौगोलीक पृथकता
2)सामाजिक पृथकता
3)सांस्कृतिक पृथकता
4)सभ्य समाजासी संपर्क
5)औद्योगीकरण
6)प्रशासकीय हस्तक्षेप

इत्यादी कारणे महत्वपुर्ण ठरले आहेत. प्रशासकीय हस्तक्षेपामध्ये आदिवासीचे जंगल विषयक आधिकार हे पांरपांरीक अलिखित होते. त्यासाठी कुनाचीही परवानगीची गरज नव्हती. परंतु ब्रिटिश राजवटीत जंगल खाते सुरू झाले व अनेक जंगल विषयक कायदे आदिवासींवर लादण्यात आले. त्याच प्रमाणे वर्षानुवर्षे आदिवासीवर आत्याचार होत गेले. पश्चिम विदर्भातील आदिवासीच्या समस्या प्रामुख्याने पुढिल प्रमाणे पाहता येईल.

### 1) आर्थिक शोषणः—

आदिवासींचे आर्थिक शोषन करणाऱ्यामध्ये सावकार, ठेकेदार, व्यापारी, जंगलाचे वनअधिकारी यांचा समावेश होतो. आदिवासी हे शेतीच्या नापिकीमुळे सावकाराकडुन कर्ज काढत असत. सावकार कर्ज देऊन दाम दुप्पट वसुल करित असत. म्हणुन कर्जातुन कर्ज असे चक्र चालुच राहते. आणि कर्जबाजारीपणा सातत्यानी दिसुन येते. ठेकेदार आदिवासीं श्रमिकांना बेठबिगारीला धरतात त्यांच्याकडून कामे करून घेतात आणि त्यांच्या कामाचा मोबदला अत्यंत कमी देतात. व्यापारी सुध्या मध, चारोळ्या, डिंक या वस्तु अल्प किमंतीत घेतात व त्यांना मोबदलाही कमी देतात. जगंल आधिकारी आदिवासी लोकांच्या हक्कावर गदा आनतात. वेळ प्रसंगी त्यांना आपला धाक दाखवुन आदिवासींचे आर्थिक शोषण करतात.

### 2) शेतीविषयक समस्याः—

पश्चिम विदर्भात आदिवासी हा समाज पारंपारीक पध्दतीने शेती करीताना दिसून येते. त्यामुळे शेतीत उत्पादन अत्यअल्प प्रमाणात होते. त्यामुळे आदिवासीचे उदरनिर्वाह सुध्दा होत नाही. बी, बियाणे, अवजारे, व तंत्रात विशेष सुधारणा आढळत नाही.



महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळा तर्फे जे बी बीयाणे मिळते ते शेतकऱ्यापर्यंत पोहचतचं नाही. यवतमाळ , वाशिम, बुलठाणा, आकोला, अमरावती येथिल बंहुतांश आदिवासी जवळ ओलीताच्या शेतींचा अभाव दिसुन येतो. त्यामुळे पश्चिम विदर्भातील आदिवासींचे अल्पप्रमाणात उत्पन्न, जुनी बी बियाने, तंत्रज्ञाणाचा अभाव यासारख्या समस्या शेतीच्या सदंर्भात दिसुन येते.

### 3) कर्जबाजारीपणाः—

पश्चिम विदर्भातील आदिवासी मध्ये आजही कर्जबाजारीपणा दिसुन येतो. पश्चिम विदर्भात पाहीजे त्या प्रमाणात शेती उत्पादन होत नाही व पाहीजे त्या प्रमाणात शेतमजुरांना मोबदलाही मीळत नाही. त्यामुळे मिळालेल्या उत्पन्नावर आदिवासींचा उदरनिर्वाह ही होत नाही. सावकार व ठेकेदार हे सुध्दा आदिवासीचे आर्थिक शोषन करतात. आदिवासीना कर्ज देतात व किमंती पेक्षा दुप्पटीन कर्ज वसुली करतात. त्सामुळे आदिवासी हा कर्जबाजारीच्याा 'चक्रव्युवाहातचं' आडकलेला दिसुन येते. काही आदिवासी बॅकेतुन कर्ज काढून शेती करतात व त्यातच शेती नापिकीमुळे बॅकेचे कर्ज ही फेडू शकत नाही. अशी आदिवासीची वाईट परिस्थिती दिसुन येते.

### 4)गरीबीः—

गरिबी ही आदिवासी समाजाच्या पाचविलाचं पुजलेली आहे असे दिसुन येते. पश्चिम विदर्भातील आदिवासी हे परंपरागत आर्थिक जीवन जगतानी दिसुन येते.




कर्जबाजारीपणा, सावकार, ठेकेदार, व्यापारी या लोकाद्वारे होणारे आर्थिक शोषण, आदिवासींचे अज्ञान, साधे जीवनमान या कारणानी शतकानुशतकापासुन आदिवासींच्या जीवनात गरिबी दिसून येते. मोलमजुरी करून एका वेळेची कमाई करून दोन साजचं जेवण तळहातावर घेऊन खाणे यामुळे अन्न, वस्त्र, निवारा या सारख्या न्युनतंम गरजा ही पुर्ण करू शकत नाही. अशी स्थिती आहे म्हणुन आदिवासी समाजामध्ये गरिबीचे प्रमाण जास्त आहे.

### *5) औद्योगीक क्षेत्रातील आदिवासींच्या समस्याः—*

आधुनिक उद्योगधंद्याचे जाळे वाढता वाढता दुर्गम परिसरात ही राहणाऱ्या आदिवासींनाही त्यांचा स्पर्श झालेला आहे. त्याच्यांच परिसरात चालु झालेल्या खाणित ( उदा. वणी मधील दगडी कोळसा खान) आदिवासी काम करण्यास जाऊ लागले खरे पण तेथेही त्यांचे शोषन चालुच आहे. ठेकेदार त्यांच्याकडुन भरपुर कामे करून घेतात व त्यांना पाहीजे तसा मोबदला देत नाही. त्याना अत्यंत अल्प मजुरी दिली जाते. ऊस कारखान्यातील काम करणाऱ्या कामगारानाही पाहीजे त्या प्रमाणात मजुरी मिळत नाही.

### *6) दळण वळणाच्या समस्याः—*

आदिवासी हे जंगल विभागात राहतात. भैगोलिकदृष्टा प्रस्तुत आदिवासींचा क्षेत्र विभाग म्हणजे दऱ्या खोऱ्यात, डोंगर टेकड्या, पठारी भाग, जंगल अरण्य यांनी युक्त असतो. अशा प्रदेशात रस्ते काढणे जोकरीचे काम असते. आजही बहुंताश आदिवासी क्षेत्रात रस्ते, टपालखाते, तारायंत्र या दळणवळणासाठी व संदेश वहणासाठी आवश्यक अशा साधणाची व्यवस्था करण्यात आलेली दिसुन येत नाही. त्यांना मैलो मैल दुर अंतरावर पायवाट चालत जावे लागते. पश्चिम विदर्भातील अमरावती जिल्हातील मेळघाट परिसरात व चिखलदरा या परिसरात आजही आदिवासी मैलो मैल अंतर चालत येतात व चालत जातात. यवतमाळ जिल्हातील महागांव तालुक्यातील शिरमाळ या गावात ही दळणवळणासाठी रस्ते नाहीत. त्याना माळरानावर राहावे लागते. तेथुन ते पायवाट चालत येतात. अशा वाईट परिस्थितीचा सामना या आदिवासीना करावा लागतो.

### 7) कन्यामुल्य :—

पश्चिम विदर्भातील आदिवासी मध्ये कन्यामुल्य भरमसाठ वाढल्याचे दिसुन येते. त्यांचे मुख्य कारण म्हणजे प्रगत समाजाच्या संर्पकात येऊन आदिवासींनीही त्याची कन्यामुल्य प्रथा अवलंबली आहे.



पुर्वी विवाह प्रसंगी कन्यामुल्य मणुन धान्यवस्तु दिल्या जात असत, परंतु पुढे मुद्रेच्या प्रचलनामुळे कन्यामुल्य हे मुद्रेच्या स्वरूपात ठरू लागले. आता आदिवासी समाजात पैशाला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. परंतु अर्थाजन करणे त्यापेक्षाही कठिन असल्याकारणानी आदिवासी समाजात कन्यामुल्य देणे अशक्यप्राय झाले आहे. त्यातुनंच मुला मुलींच्या लग्नास प्रश्न निर्माण झाले आहे. आंध, गोंड, परधान, या जमातीत कन्यामुल्य अधिक प्रमाणात दिसुन येते.

### 8) आरोग्याचा प्रश्न :–

आदिवासी हा मुळातच जगल प्रदेशात व ग्रामिण भागात राहत असल्यामुळे या ठिकानी सुध्द पाण्याची व्यवस्था नाही. काही ठिकानी नदी नाल्याचे पाणि प्यावे लागते. त्यातुन रोगराई वाढणे, चांगली घरे, पुरेसे कपडे नसल्याकारणानी आदिवासींना चर्मरोग व मलेरिया सारख्या रोगाना तोंड दयावे लागते.



आदिवासी क्षेत्रात स्वास्थाचा प्रश्न कठिन झाला आहे. दुसरे म्हणजे या आदिवासी भागात दवाखाने व डॉक्टराची संख्या फारच कमी आहे. त्यामुळे रोग्याला वैद्यकीय मदत लवकर मिळत नाही. या परिस्थितीत अनेक रोगी मृत्युमुखी पडत आहेत. व बालमृत्युचे प्रमाण सुध्दा लक्षणिय आदिवासी समाजात दिसुन येते.

### 9) आदिवासींची बोलीभाषा लुप्त होण्याच्या मार्गावरः–

आदिवासींची बोलीभाषा ही स्वतंत्र आहे. परंतु आज औद्योगिकरणामुळे अनेक आदिवासी शहराच्या जवळ हळुहळु यायला लागले आहे. व आपली स्वतंत्र बोलीभाषा हे विसरत चाललेले आहे. प्रगत समाजाच्या संपर्कात येऊन त्यांची भाषा अवगत करताना दिसुन येत आहे. या सर्व प्रभावातुन आदिवासी समाजाच्या बोली भाषेची पिछेहाट होऊ लागली आहे. त्यांच्या बोली भाषेतील कथा, गीते, विसरली जातात की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. एकूणच लिपी व लोकसाहित्याच्या संदर्भात मुलभूत असा ऱ्हासाचा प्रश्न उद्‌भवलेलाच दिसतो.

### 10) अनिष्ट प्रथांचा शिरकावः

बाह्य लोकांशी संपर्क आल्याने आदीवारीच्या काही चांगल्या प्रथा इतिहास जमा होऊ लागला आहेत. पण त्याच बरोबर बाह्य जगातील अनिष्ट प्रथाचा आदीवासींच्या जीवनावर परिणाम होत आहे.



आदिवासी शेतीचे कामे करीत असतांना शेताची पुजा करतांना दिसुन येतात. त्याच बरोबर जादु टोणा दिसुन येतो. आदीवासी समाजात बाल विवाहाची प्रथा नव्हती पण हिंदू समाजाच्या संपर्कात आल्याने बाल विवाहाची प्रथा थोड्या प्रमाणात दिसून येते. वधुमुल्य, अंधश्रध्दा, या सारख्या वाईट प्रथा आदिवासी मध्ये होऊ लागल्या आहे. नविन पिढीला सांस्कृतिक शिक्षण देणाऱ्या काही संस्थाच्या ऱ्हासामुळे आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक मुल्याना तडे जाऊ लागले.

### 11) व्यसनाधीनता :–

मद्यपान हा आदिवासी समाजाचा अत्यंत महत्वपुर्ण भाग आहे.



स्त्री असो अथवा पुरूष, कोणत्याही वयाचे असो, मोहाची, गुळाची, तांदळाची, ताडी, माडी, सल्फी, अथवा कोण्त्याही प्रकारची दारू घरगुती किंवा गावपातळीवर तयार केली जाते.



आणि कोणत्याही कार्यक्रमाच्या वेळी दारूचे सेवन केले जाते. परंतु कित्येकदा बऱ्याच लोकांणकडुन त्यांचा अतिरेक होऊन त्यांचे पर्यवसान व्यसनात होताना दिसते. अमरावती मधील मेळघाट, चिखलदरा, आकोला, वाशिम, बुलठाना, यवतमाळ या जिल्हातील सरास आदिवासी कार्यक्रमाच्या वेळी विशेषता पोळा, गणपती उत्सव, दुर्गादेवी उत्सव, होळी (रंगपंच्चमी) या कार्यक्रमाच्या वेळी आमली पदार्थाचे सेवन करीताना दिसतात.

### 12) शैक्षणिक समस्या :–

आदिवासीच्या शिक्षणासाठी सरकारी योजना, सुविधा, अत्यंत चांगल्या असुनही मिळावे तेवढे यश शिक्षणाच्या बाबतीत मिळालेले नाही. जेवनासह दुध, नास्ता, फळे आणि तेल साबन इत्यादी साहित्य विद्यार्थाना मिळते.



परंतु या सर्व सुखसुविधा त्यांच्या पर्यत पोहचतच नाही. या शिवाय शहरातील वसतीगृह असो अथवा आश्रम शाळा असो या सर्व योजना फक्त कागदोपत्रीच असतात. जे काही आदिवासीच्या शिक्षणासाठी आर्थिक फंड येतो व खर्च केला जाता त्यात काही टक्केच खर्च

केला जातो. उर्वरित फंड काही भ्रष्ट आधिकारीच आपले खिसे भरताना दिसुन येते. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावलेला दिसुन येते. तसेच आश्रम शाळेत पाहीजे तसा शैक्षणिक दर्जा चांगला दिसुन येत नाही. त्यामुळेच विद्यार्थी आश्रम शाळेतुन पळुन येताना दिसुन येते. या कारणानी आदिवासी समाजामध्ये शिक्षणाकडे कानाडोळा केल्याचे दिसुन येते.

### 13) बोगस आदिवासी एक समस्या :–

जितक्या सवलती अधिक तितका गैरवापर अधिक, असा मतप्रवाह आढळतो. आदिवासींना मिळालेल्या घटनात्मक तरतुदीमुळे बिगर अथवा बोगस आदिवासींनी आपन आदिवासी आहोत असे जाहीर करून खोटे प्रमाणपत्र बनुण सवलती मिळवण्याचे प्रकार घडु लागले आहेत. या सर्व गोष्टी उजेडात येऊ लागल्या त्याचप्रमाणे आदिवासी समाज पडताळणी सुरू झाली. आणि पुढे असे निर्देशनात आले की, हजारो आदिवासींच्या नौकऱ्या ह्या बोगस आदिवासींनी हडपल्या आहे. व खऱ्या आदिवासींची रोजी रोटी हिसकावुन घेतली आहे.

आज धनगर व बंजारा समाजही म्हणतो की, आम्ही आदिवासी आहोत परंतु आदिवासी व धनगर किंवा बंजारा या समाजातील कोणतेच वैशिष्ट्ये हे आदिवासी समाजासी मिळते जुळते नाही. मग धनगर व बंजारा हे कसे आदिवासी असु शकेल. त्यामुळे आज खाऱ्या आदिवासी मध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या

### आदिवासींच्या समस्येवरिल करावयाचे उपायः–

आदिवासी समाजाचा अध्ययन करताना त्यांच्या समस्याचां अभ्यास करणे अतीशय महत्वाचे आहे. त्यांच बरोबर त्यावरिल उपाय पाहणे हे पण तितकेच महत्वाचे आहे. त्याकरिता आदिवासींच्या समस्येवर पुढील प्रमाणे प्रकाश टाकता येईल.

1) आदिवासींचा आर्थिक विकासाकडे लक्ष देणे.
2) शावकार व ठेकेदार यांच्या पाशवी जाळ्यातुन आदिवासींचा बचाव करणे.
3) आदिवासींच्या जल,जंगल,जमिनीचे स्वंरक्षण करणे.
4) ग्रामिण भागातील आदिवासींच्या आरोग्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातुन आरोग्य विषयक सुख सुविधाचा पुरवढा करण्याकडे लक्ष देणे.
5) आदिवासी मध्ये शिक्षण विषयक जनजागृती करून शिक्षणाचे महत्व पटवुन देणे.
6) आदिवासीमधील आंधश्रधेवर आळा घालुन त्यांच्यात जनजागृती करणे.
8) आदिवासींना मादक पदार्थाचे सेवन न करण्यास परावृत्त करणे व दारूबंदीवर विशेष मोहीम राबविने.
9) आदिवासी भागात 'गांव तेथे रस्ता'ही योजना राबवुन दिवा बत्तीची व्यवस्था करावी.
10) आदिवासींचे शोषण व त्यांची फसवनुक कणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी..
11) आदिवासींच्या जमिनी बळकावण्यात येत आहेत. त्यावर न्यायालयानी तंतोतंत कारवई करावी. व आदिवासींच्या जमीनी त्यांना परत कराव्या.
12) आदिवासीं विकास विभागात होणाऱ्या भ्रष्टचारावर शासणानी निपुन्ता आणावी.
13) आदिवासी वसतीगृह व आश्रमशाळेत होणारा भ्रष्टाचार व तेथील समस्यावरील उपाय योजनेकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
14) आदिवासींना मिळणाऱ्या योजना त्यांच्या पर्यंत पोहचतात की नाही याकडे शासनाही गांभीर्याने लक्ष देऊन तेथील ग्रामिण भागात जाऊन प्रत्यक्षात पाहनी करणे आवश्यक आहे.
15) आदिवींना प्रगत समाजाच्या संपर्कात आनावे, परंतु आदिवासींच्या संस्कृतीवर हल्ला हीऊ नये याकडे विशेष गाभिर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

वरिल पश्चिम विदर्भातील आदिवासींच्या समस्येच्या उपायावर लक्ष देणे आज इतिहासाच्या दृष्टीकोनातुन खुप महत्वाचे झाले आहे. त्यामुळेच केंद्र शासणानी व राज्यशासनाही आदिवासींचा विकास व्हावा या दृष्टीकोनातुन काही योजना राबविल्या आहेत त्यांचा ही उल्लेख करणे महत्वाचे आहे.

### आदिवासीसाठी राबविल्या जाणाऱ्या योजना.

आदिवासी हा समाजातील अतिदुर्बल घटक आहे. त्यांच्या विकासासाठी राज्य घटनेतील तरतुदी नुसार भारताच्या लोकसभा आणि विधीमंडळामध्ये राखिव जागाची तरतुद घटनेतील कलम 330, 320 आणि 334 नुसार केले आहेत. शासनाने 1974 पुर्वी त्यांच्या विकासासाठी बरेच प्रर्यत्न केले. परंतु त्या काळात आदिवासींचा म्हणावा तितका विकास होऊ शकला नाही. त्यामुळे पंच्चवार्षिक योजनेत बदल करण्याचे शासनाने ठरविले.

1) शैक्षणिक विकास होण्यासाठी सुधारित आश्रम शाळा व वसतीगृहाची पारदर्शकता असणे महत्वाचे आहे. तसेच शिष्यवृत्ती व्यसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थाना निवाहभत्ता देण्यात येत आहे. आदिवासी मुला मुंलीची गळती थांबवण्यासाठी दरमहा प्रोत्साहन भत्ता ही देण्यात येते.
2) पशुसवंर्धन योजने अंतर्गत माध्यमिक शालांन्त परिक्षा उत्तीर्ण झालेल्या आदिवासी विद्यार्थाना स्वंयमरोजगाराच्या संधी उपलब्द करून देण्याकरिता कृषी महाविद्यालयामध्ये अशा विद्यार्थाना मोफत शिक्षण व राहण्या खाण्याची व्यवस्था करून देण्यात येते. यात पशु चिकत्सा, दुग्ध व्यवसाय, कुकूट पालन, शेळीपालन, मत्सपालन इत्यादी व्यवसायाचे प्रशिक्षन देण्यात येते.
3) आदिवासींचा आर्थिक विकाय व्हावा म्हणुन शेतकऱ्याना विजपंप, तेलपंप 100 टक्के अनुदानावर दिले जाते.
4) समाजकल्यान विभाग जिल्हा परिषदेच्या अंर्तगत अनुसुचित जमातीच्या लोंकाना घर टिन पत्रे दिली जातात.
5) खावटी कर्ज योजना अल्पभुधारक व शेतमजुरासाठी पावसाळ्यात उपासमारी व आर्थिक शोषन थांबवण्यासाठी प्रतिकुटूंब 2000 रू ते 4000 रू पर्यंतचे 90 टक्के धान्य रूपाने आदिवासी महामंडळामार्फत खावटी कर्ज योजना पुरविली जाते.

6) सुधरित कुषी अवजारे सयंत्र खरिदी करण्यासाठी अनुदान योजना कृषी विभागाकडुन अर्जदाराना सुधारीत अवजारे व सयंत्र खरेदीकरिता 10,000 रू पर्यंत 50 टक्के अनुदान देण्यात येते.
7) आदिवासींच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे ही एक महत्वपुर्ण गरज आहे. त्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेत त्याला उपक्रम देण्यात आला. त्यासांठी 2.43 कोटी रू. खर्चाची तरतुद करण्यात आली.
8) आदिवासींच्या उपचाराविषयी अनास्था लक्षात घेऊनचं त्याच्यात आदिवासी क्षेत्रात दवाखाण्याची सोय उपलब्ध केली आहे. दुसऱ्या पंच्चवार्षिक योजनेत 456 दवाखाने व 106 वैदिकिय मदत केंद्र उघडण्यात आले.
9) आदिवासींच्या जीवनात एक प्रकारचे ध्येर्य निर्माण करण्यासाठी त्यांची घरे वसाहती या बाबत योजना आखण्यात आल्या आहेत. त्यासाठी सरकारने घरे बांधुन देण्यापासुन कर्जाचीही तरतुद केली आहे. दुसऱ्या योजनेत सरकारने 2 कोटी रूपये व केंद्रशासनाने 3 कोटी रूपये खर्च केले आहे.

वरिल सर्व आदिवासी विकास योजनेतुन काही प्रमाणत आदिवासींच्या विकास योजनेतुन काही प्रमाणात आदिवासींचा विकास झालेला दिसुन येतो. मात्र बंहूतांश आदिवासी समाजात आजही या योजना त्यांच्या पर्यंत पोहचल्या नाहीत. आणि या योजनेपासुन आदिवासी समाज वंचित आहे.

## *निष्कर्ष :—*

कल्याणकारी राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न उराशी बाळगुन वाटचाल करण्याऱ्या भारत देशाला अतिमागास असलेल्या आदिवासी समाजाकडे दुर्लश करून आपली सर्वकस प्रगती साधणे शक्य होणार नाही. आज आदिवासी विकासासाठी ज्या योजना राबविल्या जातात त्या कल्यान कार्यक्रमाच्या अमलबजावणीची चुकीची पध्दत अवलंबल्यामुळे आजपर्यत त्यांचा विकास झालेला दिसुन येत नाही. आदिवासी विकास कामाचे सरकारीकरण योग्य नाही. सरकार कडुन बिगर किंवा बोगस आदिवासी लोकांचे हितसंबध जोपासले जातात. शिक्षणाचे प्रमाण पाहीजे तेवढे निर्माण झालेले दिसत नाही. त्यामुळे सरकारने एवढ्या योजना आखल्यानतंरही आदिवासींचा विकास पाहीजे तेवढा दिसुन येत नाही.

## *संदभ ग्रथसुची :—*

1) डॉ. प्रा. बी. आर. मस्के— विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास. नभ प्रकाशन, अमरावती प्रथमावृत्ती 14 एप्रिल 2012.
2) गुरूनाथ नाडगोंडे— भारतीय आदिवासी. कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, चतुर्थावृत्ती 2012.
3) शोनक कुलकर्णी— महाराष्ट्रातील आदिवासी. डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथमावृत्ती 2009.
4) भा.कि.खडसे— थारतातील सामाजिक समस्या. श्री मंगेश प्रकाशन, नागपुर आठवी आवृत्ती 2009.
5) सुर्यकांता अजमेरा (संपा.) आदिवासी आणि ग्रामिण विकास. अर्थव पब्लीकेशन, धुळे, प्रथमावृत्ती 2010.
6)गोंविद गारे— महाराष्ट्रातील आदिवासी जमाती. कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, तृत्तीयावृत्ती 2012.